नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - ११४ Issue - 114 | वार गुरुवार दि. ११ सप्टेंबर २०२५ Blow- Thursday Date 11 September 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## आम्हाला आमच्या संविधानाचा अभिमान : सर्वोच्च न्यायालय

### नेपाळमध्ये निर्माण झालेल्या संघर्षाच्या स्थितीचा सुप्रीम कोर्टातील सुनावणीत उल्लेख

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : नेपाळमध्ये निमर्णि झालेल्या संघर्षाच्या स्थितीचा सुप्रीम कोर्टातील सुनावणीत उल्लेख झाला. सरन्यायाधीशांच्या नेतृत्त्वातील पाच न्यायमूर्तींच्या संविधान पीठानं याबाबत महत्त्वाची टिप्पणी केली आहे. सरन्यायाधीश बी. आर. गवई यांनी आम्हाला आपल्या संविधानाचा अभिमान आहे. ते भारताच्या शेजारच्या देशांच्या स्थितीचा उल्लेख करत म्हणाले की आपल्या शेजारच्या देशांमध्ये काय घडतंय ते पाहा. नेपाळमध्ये देखील आम्ही पाहिलं. याचवेळी न्यायमूर्ती विक्रम नाथ यांनी बांगलादेशचा उल्लेख केला.

सरन्यायाधीश म्हणाले आपल्या शेजारच्या देशांमध्ये काय होतंय पाहा, नेपाळमध्ये देखील आम्ही पाहिलं. यावर न्यायमूर्ती विक्रम नाथ म्हणाले की बांगलादेशमध्ये देखील असंच झालं. संविधान पीठ राष्ट्रपतींच्या संदर्भावर सुनावणी करत आहे. विशेष म्हणजे भारताचे सरन्यायाधीश भूषण गवई गेल्या आठवड्यात नेपाळच्या दौऱ्यावर गेले होते. तिथं त्यांनी नेपाळ सुप्रीम कोर्टाचे सरन्यायाधीश प्रकाश मानसिंह राऊत यांची भेट घेतली होती. गवई यांनी भगवान गौतम बुद्धाचं जन्मस्थळ लुंबिनी येथे दर्शन पूज करत दीप प्रज्वलित केले होते.



सॉलिसिटर जनरल तुषार मेहता संविधानातील राज्यपालांना मिळालेल्या अधिकारांचा किंवा शक्तीसंदर्भात युक्तिवाद करत होते. तेव्हा सरन्यायाधीशांनी हे मत व्यक्त केलं. तुषार मेहता यांनी राज्यपालांनी एक महिन्यांपेक्षा अधिक वेळ विधेयक मंजूर करण्यासाठी लावल्याची संख्या कमी असल्याच्या आकडेवारीच्या आधारे युक्तिवाद करण्याचा प्रयत्न केला. यावर सरन्यायाधीश भूषण गवई म्हणाले ,आम्ही आकडे घेऊ शकत नाही, हा त्यांच्यासोबत न्याय होणार नाही, आम्ही त्यांचे आकडे घेतले नाहीत, त्यामुळं तुमचे कसे घेऊ शकतो.

सरन्यायाधीश भूषण गवई पुढं म्हणाले की आम्ही यात जाणार नाही, पुन्हा आम्हाला अनवश्यकपणे आकडेवारीत जायचं नाही. तुम्ही पहिल्यांदा त्यांच्या आकड्यांवर आक्षेप घेतले होते. त्यावर तुषार मेहता म्हणाले ९० टक्के विधेयकांना एक महिन्यात मंजुरी दिली गेलीय. १९७० पासून २०२५ पर्यंत २० विधेयक प्रलंबित आहेत, त्यात तामिळनाडूतील ७ विधेयकांचा समावेश आहे.

न्यायमूर्ती विक्रम नाथ यांनी म्हटलं की आपलं संविधान ७५ वर्षांपासून संविधानिक आणि लोकशाही पद्धतीनं चालत आहे. या दरम्यान ५० असो किंवा ९० टक्के बिल पास झाली असतील तर त्याला काही महत्त्व नाही.

काही महिन्यांपूर्वी तामिळनाडू, केरळ आणि पंजाब या गैर भाजपशासीत राज्यांनी केंद्र सरकारनं नियुक्त केलेले राज्यपाल जाणीवपूर्वक राज्य विधिमंडळांनी मंजूर केलेली विधेयकं मंजूर करुन राष्ट्रपतींकडे मंजुरीला पाठवण्यात उशीर करत असल्याचा आरोप केला होता.

त्यानंतर एप्रिल महिन्यात तामिळनाडू राज्यपाल विरुद्ध तामिळनाडू राज्य सरकार प्रकरणात जेव्हा एकदा परत पाठवलेलं विधेयक विधिमंडळानं मंजूर करत परत पाठवल्यास ते राज्यपाल आणि राष्ट्रपतींनी ३० दिवसांमध्ये मंजूर करावं. असा निकाल सर्वोच्च न्यायालयानं दिला होता. त्या निकालाला राष्ट्रपतींनी संविधानाच्या कलम १४३ नुसार आव्हन दिलं होतं.

## राज्यभरात पुढील ४ दिवस वादळी पावसाचे अलर्ट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यात गेल्या महिन्याभरात पावसाने जोरदार हजेरी लावल्यानंतर सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यात पावसाचा जोर काहीसा ओसरला होता. आता पुन्हा एकदा पावसाला सुरुवात झाली असून विदर्भ, मराठवाड्यासह दक्षिण मध्य महाराष्ट्रात मुसळधार पावसाचे इशारे देण्यात आले आहेत. पुढील तीन ते चार दिवसात राज्यभर पुन्हा एकदा पावसाला पोषक स्थिती निर्माण झाली आहे. हवामान विभागाने पुढील पाच दिवसात विविध जिल्ह्यांना हाय अलर्ट दिले आहेत. आज सातारा, सांगली, सोलापूर तसेच मराठवाड्यात धाराशिव, लातूर, परभणी, हिंगोली व नांदेड जिल्ह्यात जोरदार पावसाची शक्यता आहे. तसेच बहुतांश मराठवाड्यातही पावसाचा जोर कायम राहणार असल्याचं सांगण्यात आलंय.



अरबी समुद्राच्या ईशान्य भागात कमी दाबाचा पट्टा सक्रिय असून तो हळूहळू पश्चिमेकडे सरकत आहे. तसेच बंगालच्या उपसागरातही पूर्व मध्यभागात पावसासाठी पोषक वातावरण तयार होत आहे. त्यामुळे आज मध्य महाराष्ट्रात तसेच मराठवाडा, विदर्भात बहुतांश ठिकाणी वादळी वाऱ्यासह पावसाची हजेरी असेल, असे हवामान विभागाने वर्तवले आहे. यावेळी वाऱ्याचा जोर ४० ते ६० कि.मी. प्रति तास राहणार असल्याचाही सांगण्यात आलंय.

१० सप्टेंबर: अमरावती, यवतमाळ, वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली, हिंगोली, परभणी, नांदेड, लातूर, धाराशिव, सोलापूर, सातारा, सांगली - येलो अलर्ट.

११ सप्टेंबर: सांगली, सातारा, सोलापूर, धाराशिव, लातूर, परभणी, नांदेड, हिंगोली, वाशिम, यवतमाळ, वर्धा, नागपूर, चंद्रपूर, भंडारा, गोंदिया, गडचिरोली - येलो अलर्ट.

१२ सप्टेंबर: पुणे, नगर, सातारा, सांगली, सोलापूर, धाराशिव, बीड, लातूर, परभणी, नांदेड, हिंगोली तसेच संपूर्ण विदर्भात पावसाचा येलो अलर्ट.

१३ सप्टेंबर: मुंबई, ठाणे, रायगड, रत्नागिरी, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, नगर, धाराशिव, लातूर, बीड, परभणी, नांदेड, हिंगोली तसेच संपूर्ण विदर्भात पावसाचा येलो अलर्ट देण्यात आलाय.

१४ सप्टेंबर: मुंबई, ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे, कोल्हापूर, सांगली, सातारा, सोलापूर, नगर, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, धाराशिव, लातूर, परभणी, नांदेड, हिंगोली, बुलढाणा, अकोला, अमरावती, वर्धा, यवतमाळ आणि वाशिम जिल्ह्याला पावसाचा येलो अलर्ट.

पुढील पाचही दिवस राज्यात विविध ठिकाणी पावसाचे अलर्ट देण्यात आले आहेत. मराठवाड्यात बहुतांश ठिकाणी पावसाचा जोर वाढेल, तर उर्वरित भागात ढगाळ वातावरणाची शक्यता आहे.

## देशभरातील मतदार याद्यांच्या फेरतपासणीसाठी आयोगाकडून आढावा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : महाराष्ट्रात आगामी काळात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पार पडणार आहेत. या निवडणुकांसाठी प्रत्येर पक्षाच्या गोटात जोरदार हालचाली सुरु आहेत. प्रत्येक पक्ष स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी मोर्चाबांधणी आखत आहे. याचाच एक भाग म्हणजे वेगवेगळ्या पक्षांमध्ये सध्या जोरदार पक्षप्रवेशाचे कार्यक्रम पार पडत आहेत. प्रत्येक पक्ष स्थानिक पातळीवर आपला पक्ष मजबुत करण्यासाठी प्रयत्न करत आहे. त्यासाठी स्थानिक माजी नगरसेवकांना गळाला लावलं जात आहे. स्थानिप पातळीवर संघटना मजबूत करुन निवडणुकांमध्ये यश मिळवण्याचा प्रत्येकाचा प्रयत्न आहे. या निवडणुका दिवाळीनंतर पार पडण्याची शक्यता आहे. असं असताना आता एक अतिशय महत्त्वाची आणि मोठी बातमी समोर येत आहे.

केंद्रीय निवडणूक आयोग महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांआधी

### महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांआधी केंद्रीय निवडणूक आयोगाचं मोठं पाऊल

बिहारप्रमाणे महाराष्ट्रातही मतदार याद्यांची सखोल फेरतपासणी करण्याच्या तयारीत आहे. केंद्रीय निवडणूक आयोग देशभरात मतदार याद्यांची फेरतपासणी करण्याच्या तयारीत आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाने सर्व राज्यांच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांची परिषद घेतली आहे. या परिषदेत देशभरातील मतदार याद्यांच्या फेरतपासणीसाठी आयोगाकडून आढावा घेण्यात आला.

विशेष म्हणजे बिहारमधील मतदार याद्यांच्या फेरतपासणीवर विरोधकांकडून आक्षेप घेण्यात आला आहे. काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी त्यावर गंभीर आरोप केले आहेत. विरोधकांकडून केंद्रीय निवडणूक आयोगावर गंभीर आरोप केले जात आहेत. तरीही केंद्र सरकारकडून देशभरात मतदार याद्यांची फेरतपासणी करण्यात येत आहे. यासाठी केंद्रीय निवडणूक आयोगाने सर्व राज्यांच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांसोबत महत्त्वाची परिषद घेतली. यामध्ये मतदार याद्यांची फेरतपासणी करण्यासाठी कुठपर्यंत तयारी झाली. तसेच प्रत्यक्ष विशेष मतदारयादी परिक्षण कधी राबवलं जाऊ शकतं, याबाबत माहिती घेण्यात आली. केंद्रीय निवडणूक आयोगाने राज्यांच्या मुख्य निवडणूक आयुक्तांच्या घेतलेल्या या परिषदेत काही महत्त्वाच्या देखील सूचना देण्यात आल्या आहेत. १२०० पेक्षा जास्त मतदार एका मतदार केंद्रावर नसतील याची काळजी घेण्यास सांगण्यात आलं आहे. त्यामुळे आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत महाराष्ट्रात नवे मतदार पोलिंग स्टेशन तयार होऊ शकतात. तसेच महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांधी मतदार याद्यांची फेरतपासणी केली जाऊ शकते,

## टीम इंडियाचा विजयाने श्रीगणेशा; यूएईवर दणदणीत विजय

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : आशिया कप २०२५ टी-२० स्पर्धेला भारतीय संघाने विजयी सुरुवात केली आहे. ग्रुप-ए मधील पहिल्या सामन्यात भारताने संयुक्त अरब अमिरातीचा (यूएई) सहज पराभव करत गुणतालिकेत आपले खाते उघडले. अभिषेक शर्मा आणि शुभमन गिल या जोडीने हा सामना जिंकण्यासाठी भारताला एक छोटे लक्ष्य दिले होते, जे एकतर्फी केले. सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाने सर्वांगिण कामगिरी करत एकतर्फी लढतीत विजय मिळवला.



आशिया कपमधील दुसऱ्या सामन्यात यूएईचा संघ पहिल्यांदा फलंदाजीला उतरला. कर्णधार मोहम्मद वसीम आणि शराफू यांनी दमदार सुरुवात करून पहिले दोन षटके गाजवले. चौथ्या षटकात मात्र जसप्रीत बुमराहने शराफूला बोल्ड करून भारताला पहिलं यश मिळवून दिलं. शराफूने २२ धावा केल्या. यानंतर पाचव्या षटकात वरुण चक्रवर्तीने जोहैबला माघारी धाडलं. पाच षटकांनंतर यूएईचा स्कोर ३२-२ असा झाला.

मोहम्मद वसीमकडून मोठ्या खेळीची अपेक्षा होती. पण त्याआधीच कुलदीप यादवने फिरकीच्या जाळ्यात यूएईला गुंतवलं. त्याने एकामागून एक गडी बाद करत यूएईची पाठ मोडली. कुलदीपनंतर शिवम दुबेनेही गोलंदाजीमध्ये कहर केला. अखेर संपूर्ण यूएई संघ केवळ ५७ धावांवर गारद झाला. भारताकडून कुलदीप यादवने ४ बळी टिपले, तर शिवम दुबेने ३ गडी बाद केले.

यूएई संघाची पहिली विकेट २६ धावांवर पडली होती, पण येथून विकेट पडण्याची प्रक्रिया अशा प्रकारे सुरू झाली की, संघाने ३१ धावांत सर्व १० विकेट गमावल्या. टी-२० सामन्यात यूएईला सर्वात कमी धावसंख्यापर्यंत रोखणारा भारत हा देश बनला आहे. यापूर्वी, यूएईचा टी-२० मध्ये सर्वात कमी धावसंख्या ६२ धावा होती, जी त्यांनी २०२४ मध्ये स्कॉटलंडविरुद्ध केली होती. पण आता टीम इंडियाने यूएईला सर्वात कमी धावसंख्या (५७ धावा) पर्यंत रोखले आहे.

भारताला हा सामना जिंकण्यासाठी फक्त ५८ धावांचे लक्ष्य मिळाले. लक्ष्याचा पाठलाग करताना भारताचा सुरुवातीपासूनच आक्रमक अंदाज होता.

### ओबीसी उपसमितीच्या बैठकीत महत्त्वाचा निर्णय

### रोहित पवार यांनी राजकारणाची घाई करु नये

## ओबीसींवर अन्याय होणार नाही, खोट्या नोंदी नकोच



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : ओबीसींच्या मनात आपल्यावर अन्याय होईल अशी भीती आहे. पण, तसे काही होणार नाही. कुणबी नोंदी आहेत,त्यांनाच अध्यादेशाप्रमाणे प्रमाणपत्र मिळणार असून त्यासाठी प्रमाणपत्र, कुणबी नातेसंबंध, ग्रामसमिती, तहसीलदारांच्या स्तरावरील समितीचा अहवाल घ्यावा लागणार आहेत. वंशावळ जुळल्यानंतर सर्व कागदपत्रांच्या पूर्ततेनंतरच दाखला देण्यात येईल. फक्त खोट्या नोंदी होणार नाहीत याबाबत उपविभागीय अधिकाऱ्यांनी काळजी घेण्याची आवश्यकता असून, शासन निर्णयाप्रमाणेच पुढे जावे अशी अपेक्षा उपसमितीतील सर्वच सदस्यांनी व्यक्त केली,अशी माहिती मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष व महसूलमंत्री चंद्रशेखर बावकुळे यांनी दिली.

इतर मागासवर्गीयसंदर्भात ( ओबीसी ) मंत्रिमंडळ उपसमितीची पहिली बैठक मंत्रालयात पार पडली. अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ, वनमंत्री गणेश नाईक, पाणीपुरवठा व मृदा जलसंधारण मंत्री संजय राठोड, पर्यावरण व पशुसंवर्धनमंत्री पंकजा मुंडे, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, इतर मागास विभागाचे सचिव आप्पासाहेब धुळाज आदी उपस्थित होते.

बैठकीनंतर पत्रकारांना चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले की, इतर मागासवर्गीय ( ओबीसी ) समाजात ३५३ जाती आहेत. या जातींवर अन्याय होऊ नये. सुमारे ३,६८८ कोटींचा निधी मिळणे बाकी आहे. त्यामुळे १२०० कोटी रुपयांची शिष्यवृत्ती थांबली असून ती मार्गी लावण्यात यावी. वसतिगृह बांधकाम व शासकीय कार्यालयांसाठी आवश्यक असलेल्या जागा उपलब्ध व्हाव्यात असे प्रस्ताव मीमंत्रिमंडळ उपसमिती समोर ठेवण्यात आले. कुणबी मराठा - मराठा कुणबी प्रमाणपत्र देताना चुकीच्या कागदपत्रांच्या आधारे दिले जाऊ नये,ही अपेक्षाही सदस्यांनी व्यक्त केली.

मंत्री छगन भुजबळ यांनी मराठा आरक्षणाच्या दोन अध्यादेशांवर आक्षेप घेतला होता. मात्र, त्यांना अंतिम अध्यादेश लागू करण्यात आल्याचे सांगितले. तसेच ओबीसी समाजासाठी खर्च करण्यात आलेला निधी अत्यंत कमी असून त्याबाबतही भुजबळ यांनी नाराजी व्यक्त करत अर्थविभागाने हा निधी ओबीसी समाजातील मुलांच्या शिक्षण आणि वसतीगृहांच्या सुविधांसाठी तातडीने देण्याची मागणी केली.

मंत्री पंकजा मुंडे यांनीही मराठा समाज हा सामाजिक मागास नसून आरक्षणाबाबत कागदपत्रांची अचूकता तपासूनच दाखले देण्यात यावेत अशी अपेक्षा व्यक्त केली. मंत्री संजय राठोड, गुलाबराव पाटील, दत्तात्रय भरणे, अतुल सावे, गणेश नाईक यांनी देखील आपापली भूमिका आणि मागण्या समितीसमोर मांडल्या.

बावनकुळे यांनी सांगितले की, ओबीसी समाजातील तरुणांना रोजगार आणि व्यवसाय करता यावा यासाठी त्यांना अण्णासाहेब पाटीसं अकी महामंडळाप्रमाणे कर्जवाटप करण्यात अशा पद्धतीची योजना तयार करण्यात यावी, अशी सूचना उपसमितीने केली आहे. त्याबरोबरच मंत्री छगन भुजबळ यांच्या अध्यक्षतेखालील यापूर्वीच्या समितीने केलेल्या शिफारसीही पुढीली उपसमितीच्या बैठकीत मांडण्याच्या सूचनाही करण्यात आल्या आहेत.

उपसमितीसमोरील चर्चा

१. मराठा जातीचा ओबीसी संवर्गात समावेश करण्यात येऊ नये व सरसकट मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्यात येऊ नये. २. ओबीसी विद्यार्थ्यांना व्यावसायीक अभ्यासक्रमास १०० टक्के शिष्यवृत्ती लागू करण्यात यावी. ३. गुणवंत मुलांमुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी देण्यात येणारी शिष्यवृत्ती ७५ विद्यार्थ्यांची संख्या वाढवून २०० विद्यार्थी करण्यात यावी. ४. म्हाडा व सिडको तर्फे बांधून देण्यात येणाऱ्या घरकुल योजनेत ओबीसी संवर्गासाठी आरक्षण लागू करण्यात यावे. ५. इतर मागास आर्थिक विकास महामंडळाला अँड. जनार्दन पाटील ओबीसी आर्थिक विकास महामंडळ असे नाव द्यावे. ६. प्रत्येक शहर व तालुका स्तरावर ओबीसी, व्हीजेजएनटी, एस. बी. सी. विद्यार्थ्यांसाठी सुसज्ज ग्रंथालय सुरु करण्यात यावे. ७. डॉ. पंजाबराव देशमुख ओबीसी समाजसेवक पुरस्कार जाहीर करण्यात यावा. ८. अनुसूचित जाती जमाती प्रमाणे ओबीसी, विजा., भज व विशेष मागास प्रवर्ग शेतकऱ्यांना १०० टक्के सवलतीवर राज्यात योजना सुरु करण्यात याव्यात. ९. ओबीसी आर्थिक विकास महामंडळाला एक हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात यावी.

उद्धव ठाकरेजी आणि राज ठाकरेजी हे दोघे बंधू कौटूंबिक आणि नात्याने एकत्र आले ही चांगलीच गोष्ट आहे. त्यांच्यात राजकीय कारणामुळे वाद निर्माण झाला होता आता राजकीय कारणासाठी ते एकत्र येत आहेत. त्यामध्ये वाईट वाटण्याचे काहीच कारण नाही. त्यांनी त्यांच्या पद्धतीने निवडणूक लढावी आम्ही महायुतीच्या माध्यमातून सामोरे जाऊ.

सरकारमधील एखाद्या मंत्र्यावर आरोप करताना रोहित पवार यांनी काळजी घ्यावी. एखाद्या मंत्र्यावरील आरोप म्हणजे सरकार आणि जनतेवर झालेला आरोप असतो. मी विधिमंडळात दिलेले उत्तर होते ते महसूलमंत्री म्हणून दिले होते. त्याबाबतचा निर्णय मागील सरकारच्या काळात झाला होता. तसेच तेव्हा देखील दंड माफ करण्यात आला नव्हता. याप्रकरणाची सध्या सुनावणी सुरु असून ते प्रकरण प्रलंबित आहे. त्यामुळे रोहित पवार यांनी राजकारणाची एवढी घाई करु नये.

दैनिक
# यश सिद्धि न्यूज



## संपादकीय....

### उपसमितीची बैठक

ओबीसींच्या मनात आपल्यावर अन्याय होईल अशी भीती आहे. पण, तसे काही होणार नाही. कुणबी नोंदी आहेत,त्यांनाच अध्यादेशाप्रमाणे प्रमाणपत्र मिळणार असून त्यासाठी प्रमाणपत्र, कुणबी नातेसंबंध, ग्रामसमिती, तहसीलदारांच्या स्तरावरील समितीचा अहवाल घ्यावा लागणार आहेत. वंशावळ जुळल्यानंतर सर्व कागदपत्रांच्या पूर्ततेनंतरच दाखला देण्यात येईल. फक्त खोट्या नोंदी होणार नाहीत याबाबत उपविभागीय अधिकाऱ्यांनी काळजी घेण्याची आवश्यकता असून, शासन निर्णयाप्रमाणेच पुढे जावे अशी अपेक्षा उपसमितीतील सर्वच सदस्यांनी व्यक्त केली. इतर मागासवर्गीय ( ओबीसी ) समाजात ३५३ जाती आहेत. या जातींवर अन्याय होऊ नये. सुमारे ३,६८८ कोटींचा निधी मिळणे बाकी आहे. त्यामुळे १२०० कोटी रुपयांची शिष्यवृत्ती थांबली असून ती मार्गी लावण्यात यावी. वसतिगृह बांधकाम व शासकीय कार्यालयांसाठी आवश्यक असलेल्या जागा उपलब्ध व्हाव्यात असे प्रस्ताव मीमंत्रिमंडळ उपसमिती समोर ठेवण्यात आले. कुणबी मराठा - मराठा कुणबी प्रमाणपत्र देताना चुकीच्या कागदपत्रांच्या आधारे दिले जाऊ नये,ही अपेक्षाही सदस्यांनी व्यक्त केली. मंत्री छगन भुजबळ यांनी मराठा आरक्षणाच्या दोन अध्यादेशांवर आक्षेप घेतला होता. मात्र, त्यांना अंतिम अध्यादेश लागू करण्यात आल्याचे सांगितले. तसेच ओबीसी समाजासाठी खर्च करण्यात आलेला निधी अत्यंत कमी असून त्याबाबतही भुजबळ यांनी नाराजी व्यक्त करत अर्थविभागाने हा निधी ओबीसी समाजातील मुलांच्या शिक्षण आणि वसतीगृहांच्या सुविधांसाठी तातडीने देण्याची मागणी केली. मंत्री पंकजा मुंडे यांनीही मराठा समाज हा सामाजिक मागास नसून आरक्षणाबाबत कागदपत्रांची अचूकता तपासूनच दाखले देण्यात यावेत अशी अपेक्षा व्यक्त केली. मंत्री संजय राठोड, गुलाबराव पाटील, दत्तात्रय भरणे, अतुल सावे, गणेश नाईक यांनी देखील आपापली भूमिका आणि मागण्या समितीसमोर मांडल्या. ओबीसी समाजातील तरुणांना रोजगार आणि व्यवसाय करता यावा यासाठी त्यांना अण्णासाहेब पाटीसं अकी महामंडळाप्रमाणे कर्जवाटप करण्यात अशा पद्धतीची योजना तयार करण्यात यावी, अशी सूचना उपसमितीने केली आहे.

# तरुणांसाठी स्वदेशी सल्लागार कंपन्यांचे बळ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

भविष्यातील भारत हा आपल्या युवकांच्या कौशल्यावर अवलंबून आहे. तरुणाईकडे असलेली ऊर्जा, नवकल्पना आणि मेहनत या तीन गोष्टींमुळे भारताला विकसित राष्ट्रांच्या शर्यतीत अग्रस्थानी नेण्याची क्षमता आहे. परंतु ही क्षमता योग्य दिशेने नेण्यासाठी आपल्या धोरणांत स्वदेशी विचारांचा समावेश असणे अत्यावश्यक आहे. त्यामुळेच मुख्यमंत्री आदरणीय श्री देवेंद्र फडणवीस जी यांच्या नेतृत्वाखाली कौशल्य विकास विभागाने एक ऐतिहासिक निर्णय घेतला असून, आता कौशल्य क्षेत्रातील संशोधन, धोरणनिर्मिती आणि सल्लागाराची भूमिका केवळ भारतीय कन्सलटंसी कंपन्याच पार पाडतील. हा निर्णय म्हणजे पंतप्रधान आदरणीय नरेंद्र मोदीजींच्या 'आत्मनिर्भर भारताच्या' स्वप्नाला आणि 'विकसित भारत २०४७' संकल्पनेला नवसंजीवनी देणारे पाऊल ठरणार आहे.

आज मी कौशल्य विकास विभागाचा मंत्री म्हणून नव्हे तर एक जागरूक नागरिक म्हणून आपल्याशी संवाद साधत आहे. कारण हा विषय केवळ सरकारच्या एका विभागापुरता मर्यादित नसून, आपल्याला 'राष्ट्र' म्हणून पुढे घेऊन जाणारा, आत्मनिर्भरतेच्या दिशेने मार्गदर्शन करणारा निर्णय आहे. भारतातील युवकांच्या हातात आज जगाला गवसणी घालण्याची क्षमता आहे. त्यांची ऊर्जा, ज्ञान, कार्यक्षमता ही जगातील कोणत्याही देशाशी स्पर्धा करू शकेल अशी आहे. परंतु या क्षमतेला योग्य दिशा देण्यासाठी आपल्या कौशल्य विकासाच्या धोरणांमध्ये आणि पद्धतींमध्ये भारतीय मूल्ये, भारतीय विचार आणि भारतीय दृष्टिकोन प्रतिबिंबित होणे आवश्यक आहे. म्हणूनच आम्ही ठरविले आहे की, महाराष्ट्रातील कौशल्य विकास विभागाच्या सर्व संस्थांमध्ये संशोधनात्मक काम आणि सल्लागाराची भूमिका आता केवळ स्वदेशी कन्सलटंसी कंपन्याच निभावतील.

विदेशी कंपन्यांवर अवलंबून न राहता आता स्वदेशी कन्सलटंसी कंपन्या कौशल्य विभागाशी संलग्न होणार आहेत. या निर्णयामुळे भारतीय तरुणांना रोजगार आणि कौशल्य विकासासाठी स्वदेशी सल्लागार कंपन्यांचे थेट योगदान लाभणार आहे. महाराष्ट्रातील सर्व आयटीआयमध्ये रोजगारासंबंधी संशोधन, धोरणनिर्मिती, अभ्यासक्रमाची आखणी आणि कार्यशाळांचे नियोजन, या सर्व गोष्टींमध्ये भारतीय कंपन्यांचा सहभाग असेल. हा बदल म्हणजे आपल्या युवकांच्या भविष्याकडे स्वदेशी दृष्टीकोनातून पाहण्याचा निर्धार आहे.

'आत्मनिर्भर भारत' हा पंतप्रधान आदरणीय नरेंद्र मोदीजींनी दिलेला मंत्र आता 'स्किल्ड इन इंडिया'च्या प्रवासाला नवी दिशा दाखवतो आहे. भारतीय स्टार्टअप संस्कृती आणि कन्सलटंसी कंपन्यांनी गेल्या काही वर्षांत दाखवून दिलेल्या गुणवत्तेमुळे हा निर्णय अधिक सक्षम ठरतो. त्यामुळे येणाऱ्या काळात पंतप्रधान श्री नरेंद्र मोदीजींच्या 'आत्मनिर्भर भारत' संकल्पनेला बळ आणि या माध्यमातून 'विकसित भारत २०४७' या राष्ट्रीय स्वप्नाच्या दिशेने वाटचाल अधिक वेगाने होईल, याबाबत विश्वास आहे.

मुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यात कौशल्य क्षेत्रात आधुनिकीकरण आणि अत्याधुनिक बदल घडवून आणले जात आहेत. परंतु या बदलांच्या प्रवासात भारतीय मूल्ये जपली गेली पाहिजेत. म्हणूनच स्वदेशी कंपन्यांचा सहभाग हा आमचा ठाम निर्धार आहे. कौशल्य विकास विभागाने घेतलेला हा निर्णय रतन टाटा महाराष्ट्र कौशल्य विद्यापीठ, महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी, विविध रोजगार सेवा योजन कार्यालये आणि कौशल्य विकास विभागाच्या इतर सर्व संस्थांमध्ये अंमलात आणला जाणार आहे.

आज आपल्याला केवळ रोजगारनिर्मिती नाही तर दर्जेदार, स्पर्धात्मक आणि नैतिक मूल्यांनी सज्ज असे कुशल कारागीर तयार करायचे आहेत. हे कारागीर जगाच्या बाजारपेठेत भारताचे प्रतिनिधित्व करतील. तेव्हा स्वदेशी कन्सलटंसी कंपन्यांचा सहभाग हा केवळ एक प्रशासकीय निर्णय न राहता राष्ट्रनिर्मितीच्या दिशेने उचललेले ऐतिहासिक पाऊल ठरणार आहे.

या निर्णयातून आपल्या युवकांना केवळ कौशल्य नव्हे तर आत्मविश्वास देखील मिळणार आहे. आपणही जगाला काही देऊ शकतो. ही भावना त्यांच्या मनामध्ये रुजणार आहे. यामुळे रोजगाराचा प्रश्न सुटेलच, त्याचबरोबर नवोन्मेष, संशोधन आणि तंत्रज्ञानात भारतीय तरुण आपली स्वतंत्र छाप उमटविण्यास सज्ज होणार आहेत. आपल्या राज्यातील कौशल्ययुक्त कारागिरांच्या हातातील कला, आपल्या अभियंत्यांचे संशोधन, आपल्या स्टार्टअप्सची धडाडी या सर्व गोष्टी स्वदेशी कन्सलटंसींच्या मार्गदर्शनाने अधिक प्रभावी ठरतील. गावोगावी, शहरांमध्ये कौशल्य विकासाचे नवे ऊर्जा केंद्र उभे राहतील. महिला, युवक, वंचित घटक अशा सर्वांना या नव्या दृष्टीकोनाचा लाभ होईल.

आज आपण जे निर्णय घेत आहोत ते उद्याच्या पिढ्यांच्या स्वप्नांना बळ देणारे आहेत. स्वदेशी संकल्पनेच्या माध्यमातून आपण केवळ आर्थिक आत्मनिर्भरतेकडे वाटचाल करीत नाही, तर आपल्या संस्कृतीचा, आपल्या विचारांचा आणि आपल्या अभिमानाचा वारसा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचवत आहोत. माझा ठाम विश्वास आहे की भारतीय युवक जेव्हा स्वदेशी कन्सलटंसींच्या मार्गदर्शनाखाली कौशल्य संपन्न होतील, तेव्हा आत्मनिर्भर भारत, 'मेक इन इंडिया' पासून 'स्किल्ड इंडिया' पर्यंतचा प्रवास जगाला एक नवा संदेश देईल. आत्मनिर्भरतेच्या दिशेने मार्गक्रमण करणारा भारत विकसित होऊन विश्वगुरु बनलेला असेल.

जय हिंद! जय महाराष्ट्र!

**– मंगल प्रभात लोढा**
**मंत्री, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग, महाराष्ट्र राज्य**

# श्री परमेश्वर आराधना (पर्व) पालखी महोत्सव १८ व १९ सप्टेंबर २०२५ रोजी वैभवशाली पारंपरिक पद्धतीने उत्साहात साजरा होणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/प्रतिनिधी : अक्कलकोट तालुक्यातील महाराष्ट्र कर्नाटक सिमेलगत असलेल्या प्रसिद्ध परमेश्वर पर्व यंदा १८ सप्टेंबर २०२५ गुरुवारी व १९ सप्टेंबर २०२५ शुक्रवारी संपन्न होणार आहे सालाबादाप्रमाणे या वर्षी हि श्रीमनृप शालीवाहन शके १९४७ विश्वावसूनाम संवत्सर दक्षीणायन सौर शरद ऋतु भाद्रपद मास कृष्णपक्ष तिथी ११ ता.१७/०९/२०२५ वार बुधवार सायंकाळी ४.४३ ते ६.२१ कंटली पूजा कार्यक्रम सपंन्न होईल .मिती भाद्रपद कृ. १२ शके १९४७ वार गुरुवार दि. १८/०९/२०२५ रोजी श्री. म.नि.प्र. शिवलिंगेश्वर महास्वामीजी, विरक्त मठ वागदरी यांच्या अमृत हस्ते पाहटे ४.३९ ते ६.१७ श्रींची महारुद्राभिषेक श्री.ष.ब्र. जय गुरुशांतलिंगाराध्य शिवाचार्य श्री. श्री. शांतलिंगेश्वर हिरेमठ, हिरेजेवर्गी, ता. अफजलपूर यांच्या दिव्य सानिध्यात सकाळी ११ ते १ पर्यंत अंबील घागरीची मिरवणूक, महाप्रसाद, दर्शन व आशिर्वचन दुपारी १ ते सायं. ६ पर्यंत भक्तीगीतांचा संगीत कार्यक्रम रात्री ९ वाजता परगांवच्या विविध संघांचे आगमन, भव्य भारुढ कार्यक्रम तसेच रात्री ९ वाजता श्री भागोडसिध्द गायन संघ अफजलपूर जि. कलबुर्गी–मुख्य गायक : पुंडलिक पुजारी व अमोगसिध्द गायन संघ हाडलगीरी जि. विजयपूर –मुख्य गायक : शांताबाई हाडलगीरी तसेच ११ वा. गोंधळी नाटक संपन्न होईल.

मिती भाद्रपद कृ. १३ शके १९४७ वार शुक्रवार दि. १९/०९/२०२५ रोजी म.नि.प्र. पुज्य श्री. कोरणेश्वर महास्वामीजी, धुत्तरगांव, तॉटधार्य अनुभव मंटप, आळंद यांच्या शुभहस्ते दुपारी १२.३९ ते २.४५ वाजता श्रींची पालखी पुजा तद्नंतर श्री परमेश्वर मंदिरापासून श्रींची भव्य पालखी मिरवणूक गांवातील व परगावाहून आलेल्या सर्व लेझीम, टिपरी, डफली, ढोल, झांज पथक, मलिखांब, भजन मंडळ, नंदीध्वज, नगरवाद्य, बहुरुपी व भांरुडांसोबत पालखी मिरवणूक शुक्रवार दि. १९ सप्टेंबर २०२५ रोजी रात्री ८. वाजता पालखीस सुहासिनी महाआरती संपन्न होणार आहे




असा आहे पर्व..!

दोन दिवस चालणाऱ्या या सोहळयास पर्व नावाने ओळखले जाते .श्रावण मास संपल्यानंतर उत्तरा नक्षत्राच्या दुसऱ्या चरणात येणाऱ्या गुरुवारी व शुक्रवारी पर्व साजरा केला जातो या परिसरातील शेतकरी बांधव पर्वनंतरच रब्बी पेरणी हंगामास सुरवात करतात .या परमेश्वर पर्वात प्रामुख्याने शेतकऱ्यांचा सहभाग मोठ्या संख्येने असतो..

या महोत्सवा दरम्यान दोन दिवस अंखड अन्नदान म्हणजे महाप्रसाद हुग्गी वाटप होणार आहे. या महोत्सवात सहभागी होण्याचे आवाहन पंचकमिटीच्या वतीने केले आहे

# स्मार्ट चॅम्प्स टाकळीच्या स्वप्नाली पाटील यांना बेस्ट प्रिन्सिपल अवॉर्ड प्रदान




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पत्रकार/संजय चव्हाण : इंग्लिश मीडियम स्कूल असोसिएशनच्या वतीने सोमवार दिनांक ८ सप्टेंबर रोजी हॉटेल सयाजी कोल्हापूर येथे बेस्ट प्रिन्सिपल अवॉर्ड सोहळा पार पडला.

यावर्षीचा बेस्ट प्रिन्सिपल म्हणून स्मार्ट चॅम्प्स टाकळी इंग्लिश मीडियम स्कूल सैनिक टाकळीच्या सौ. स्वप्नाली संदीप पाटील यांना कोल्हापूर जिल्हा, पालक मंत्री आणि आरोग्य मंत्री मा. आबिटकर साहेब यांच्या हस्ते आणि प्राथमिक शिक्षण अधिकारी मीना शेंडकर मॅडम व माध्यमिक शिक्षण अधिकारी सावंत मॅडम, इंग्लिश मीडियम असोसिएशन (एचड) चे पदाधिकारी या मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत मानपत्र प्रदान करण्यात आला.

यावेळी संस्थेचे संस्थापक, शिक्षक, पालक आणि नातेवाईक मोठ्या प्रमाणात उपस्थितीत होते.

हा अवॉर्ड खऱ्या अर्थाने योग्य व्यक्तीला मिळाल्याबद्दल सौ. स्वप्नाली पाटील मॅडम यांच्यावर समाजातून मोठ्या प्रमाणात कौतुक होत आहे.

## मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियान अंतर्गत

# ग्रुप ग्रामपंचायत डोहोळे येथे ग्रामस्तरीय कार्यशाळा व विशेष ग्रामसभेचे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : महाराष्ट्र शासन,शासन निर्णय, ग्रामविकास विभाग, मुंबई क्रमसपंअ -२०२५ / प्र.क्र. १५२६-११२३०५७/यो-११ दिनांक ०६ ऑगस्ट,२०२५ अन्वये व जिल्हा परिषद ठाणे व पंचायत समिती भिवंडी यांचेकडील प्राप्त सूचनांना अनुसरून ग्रुप ग्रामपंचायत डोहोळे अंतर्गत मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियान अंतर्गत कार्यशाळा शुक्रवार दि. १२/०९/२०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता ग्रुप ग्रामपंचायत डोहोळे कार्यालय येथे आयोजित करण्यात आली असुन सदर कार्यशाळेस ग्रामपंचायत स्तरावरील सरपंच,उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, ग्राम महसूल अधिकारी, कृषि सहाय्यक, आरोग्य सेवक, वन अधिकारी, मुख्याध्यापक, पशु वैद्यकीय अधिकारी, ग्राम पंचायत कर्मचारी, डाटा एंट्री ऑपरेटर, अंगणवाडी कार्यकर्ती, आशा सेविका, महिला बचत गट अध्यक्ष, सचिव, युवक मंडळ व इतर विभाग अधिकारी व कर्मचारी यांनी सदरील कार्यशाळेस उपस्थित राहणेबाबत ग्रामपंचायत डोहोळे मार्फत आवाहन करण्यात आले आहे.तसेच दिनांक १७.०९.२०२५ रोजी विशेष ग्रामसभेचे आयोजन ग्रुप ग्रामपंचायत डोहोळे सभागृह येथे करण्यात आले आहे सदर कार्यशाळा व विशेष सभेत मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियानाचे मुख्य घटक तथा विषय खालील प्रमाणे चर्चा करण्यात येणार आहेत. दिनांक १७/०९/२०२५ रोजी ग्राम सभा व ग्रामस्तरीय समितीची स्थापना करणे तसेच विषयवार लहान गट स्थापना करणे. सुशासन युक्त पंचायत (लोकाभिमुख सक्षम पंचायत प्रशासन) तयार करणे,सक्षम पंचायत (स्वनिधी, सी एस, आर व लोकवर्गणीतून पंचायत राज संस्थांना आर्थिक दृष्ट्या सक्षम करणे.) जल समृध्द, स्वच्छ व हरित गाव निर्माण करणे.मनरेगा व इतर योजनांचे अभिसरण करणे.,गावपातळीवरील संस्था सक्षमीकरण करणे. उपजिविका विकास, सामाजिक न्याय.लोकसहभाग व श्रमदान माध्यमातून लोकचळवळ निर्माण करणे.




वरील सर्व विशेष घटकांबाबत काम करण्याचे बाबत चर्चा होत असताना ग्रुप ग्रामपंचायत डोहोळे हि जशी माझी वसुंधरा अभियान मध्ये काम करताना दिसून आली, तशीच या अभियानात सुद्धा अग्रेसर राहील व आर आर

आबा (पाटिल)तालुका सुंदर गाव ग्राम,आर आर

आबा (पाटिल)जिल्हा सुंदर ग्राम तसेच संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान अंतर्गत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धेत जिल्हा प्रथम पुरस्कार यासारखे पुरस्कार ग्रामपंचायतीने मिळवली असून या अभियानात देखील नक्कीच पुरस्कार मिळवणार हि सकारात्मक चर्चा ग्रामपंचायत डोहोळे बाबत सर्व आजूबाजूच्या परिसरात होताना दिसत आहे.



# शाश्वत विकासाची दुरद्दष्टीपुर्ण लोकचळवळ : मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : राज्याचे मुख्यमंत्री व ग्राम विकास मंत्री यांच्या संकल्पेतून ग्रामीण भागाचा सर्वांगिण विकासाचे उद्दिष्ट ठेवून मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियान राबविण्याचे ठरविले आहे. या अभियानाचा मुख्य उद्देश गावागावात सुशासन प्रस्थापित करणे, ग्रामस्थांमध्ये आत्मनिर्भरता निर्माण करणे आणि विकासासाठी स्पर्धात्मक वातावरण तयार करणे आहे.योजना केवळ प्रशासकीय यंत्रणेपुरती मर्यादित नसुन, ग्रामस्थांच्या भेट सहभागावर आधारलेली आहे. ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामविकास विभाग शाश्वत विकास साधाण्यासाठी ठिबक सिंचन, शेततळी,बंधारे, जलसंवर्धन,जलयुक्त शिवार यांसाख्यायोजनांची प्रभावी अंमलबजावणी करत आहे. सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन, रासायनिक खतांचा वापर टाळण्यासाठी प्रयत्न, आवास योजनांतर्गत घरे, महिलांना बचतगटांच्या माध्यमातून सक्षम करणे, तसेच दुग्धोत्पादन मधमाशीपानल, मत्स्यव्यवसाय आणि कुक्कुटपालन यांना चालना देऊन शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यावर भर देण्यात येत आहे. या प्रयत्नांना अभियानातून प्रोत्साहन मिळणार आहे

**अभियानाचे ७ प्रमुख घटक**

१. सुशासनयुक्त पंचायत -पारदर्शक व लोकाभिमुख प्रशासन

२. सक्षम पंचायत -आर्थिक स्वाबलंबन ,कंपनी सामाजिक उत्तरदायित्व निधी (उर्फ) व लोकवर्गणी

३. जलसमृध्द, स्वच्छ व हरित गाव-पर्यावरण संरक्षण व पाणी व्यवस्थापन

४. योजनांचे अभिसरण - मनरेगा व इतर योजनांची प्रभावी अंमलबजावणी

५. संस्था सक्ष्मीकरण शाळा,अंगणवाडी, आरोग्य केंद्रे यांची बळकटी

६. उपजीपिका विकास व सामाजिक न्याय- रोजगार निमिर्ती व महिला सक्ष्मीकरण

७. लोकसहभाग व श्रमदान -ग्रामस्थांचा प्रत्यक्ष सहभाग व श्रमदान

पुरस्कार रचना

राज्यात प्रथम विजेत्या ग्रामपंचायतीस ५ कोटी रुपयांचा राज्यस्तरीय पुरस्कार दिला जाईल. तर व्दितीय ३ कोटी रुपये,तृतीय २ कोटी रुपये पुरस्कार असेल विभागस्तरीय पुरस्कार प्रत्येक विभागात ३ ग्रामपंचायतीना पुरस्कार प्रथम रुपये १ कोटी,व्दितीय रुपये ८० लाख,तृतीय रुपये ६० लाख जिल्हास्तरीय पुरस्कार प्रत्येक जिल्हयात३ ग्रामपंचायतींना पुरस्कार प्रथम रुपये ५० लाचा, व्दितीय रुपये ३० लाख, तृतीय रुपये २० लाख तालुकास्तरीय पुरस्कार:- प्रत्येक तालुक्यात ३ ग्रामपंचायतींना पुरस्कार प्रथम रुपये १५ लाख,व्दितीय रुपये १२ लाख,तृतीय रुपये ८ लाख विषेश पुरस्कार :-प्रत्येक तालुक्यातील२ ग्रामपंचायतींना प्रत्येकी ५ लाख रुपये पुरस्कार आहे.

या अभियानाचा कालावधी १७ सप्टेंबर ते ३१ डिसेंबर २०२५ असाअसून ,एकुण १०० गुणांच्या निकषांवर मुल्यांकन केले जाईल. पारदर्शक,प्रशासन, आरोग्य,शिक्षण, महिला सक्ष्मीकरण, रोजगार, पर्यावरण, कर वसुली आणि लोकसहभाग यांचा विचार केला जाईल.

मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियान ही केवळ स्पर्धा नसून ग्रामीण महाराष्ट्राच्या सामाजिक परिर्वतनाची दिशा आहे. प्रत्येक ग्रामस्थाने यात सहभाग घेतल्यास गावांचा चेहरामोहरा बदलुन शाश्वत विकास साध्य होईल. हे अभियान खऱ्या अर्थाने लोकचळवळीचे दुरदृष्टीपुर्ण पाऊल ठरेल.

मा.आ.सचिनदादा कल्याणशेट्टी यांनी वरील अभियान अक्कलकोट तालुक्यात यशस्वी करणेकरीता तालुकास्तरीय कार्यशाळेत आवाहन केले होते. आज रोजी तालुक्याचे गट विकास अधिकारी श्री.शंकर कवितके यांनी पत्रकार परिषदेत सविस्तर माहिती दिली. अभियानास व्यापक प्रचार प्रसिध्दी देणेबाबत आवाहन केले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# सोलापूर जिल्हा क्षयरोग मुक्ततेच्या दिशेने

## जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांचा 'नि-क्षय मित्र' संकल्पनेला सक्रिय पाठिंबा, स्वत:ही बनले नि-क्षय मित्र'

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/जिमाक : सामाजिक सहभाग वाढवण्यासाठी 'नि-क्षय मित्र' ही संकल्पना ९ सप्टेंबर २०२२ रोजी राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते सुरू करण्यात आली. या अंतर्गत व्यक्ती, संस्था आणि अधिकारी क्षयरोग रुग्णांना दत्तक घेऊन पोषण, तपासणी व मानसिक आधार देतात. सोलापूर जिल्हा क्षयरोग मुक्ततेच्या दिशेने महत्वपूर्ण कामगिरी करत आहे.

आज सोलापूरचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी स्वतः नि-क्षय मित्र बनून सामाजिक बांधिलकीचे उदाहरण घालून दिले आहे. तसेच जिल्ह्यातील नागरिकांनी या अभियानात सहभागी होण्याचे आवाहन केले. यावेळी टीबी मुक्त भारत अभियानाचे राज्य सल्लागार संजीव कुमार मिश्रा, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. मीनाक्षी बनसोडे उपस्थित होते.

**सन २०२४ मध्ये १९९ ग्रामपंचायतींना टीबी मुक्त दर्जा प्राप्त:**

राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रम ंतर्गत सोलापूर जिल्ह्यातील ग्रामपंचायतींनी क्षयरोगमुक्ततेच्या दिशेने उल्लेखनीय वाटचाल केली आहे. सन २०२३ मध्ये ५३ ग्रामपंचायती तर २०२४ मध्ये तब्बल १९९ ग्रामपंचायतींनी 'टीबी मुक्त' दर्जा प्राप्त केला आहे. ही कामगिरी जिल्हा प्रशासन, आरोग्य विभाग आणि समाजातील विविध घटकांच्या एकत्रित प्रयत्नांचे फलित आहे, अशी माहिती जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. मीनाक्षी बनसोडे यांनी दिली.

जिल्ह्यातील ग्रामीण भागात दरवर्षी सरासरी ३२०० ते ३५०० क्षयरोग रुग्ण खाजगी व सरकारी उपचारांखाली असतात. हा आजार विशेषतः कमी प्रतिकारशक्ती असलेल्या व्यक्तींमध्ये आढळतो-जसे की वृद्ध, डायबेटीस, डायलिसिस, कॅन्सर, एचआयव्हीग्रस्त, कुपोषित, व्यसनाधीन आणि पूर्वी टीबीग्रस्त व्यक्ती. गरिबी आणि



आजार यांच्यातील परस्पर संबंधामुळे हा आजार एक सामाजिक आव्हान ठरतो.

या कार्यक्रमांतर्गत गुणवत्तापूर्ण तपासणीसाठी मॉलिक्युलर डायग्नोस्टिक टेक्नॉलॉजीचा वापर केला जात असून, तालुका स्तरापर्यंत नेट तपासण्या उप-लब्ध आहेत. उपचार संपूर्णपणे देखरेखी-खाली आणि मोफत असून, सरकारी तसेच नोंदणीकृत खाजगी रुग्णालयांमध्येही उपलब्ध आहेत. एमडीआर (मल्टी ड्रग रेझिस्टंट) टीबी रुग्णांसाठी जून २०२५ पासून उच्च दर्जाचा इझरडच् औषध उपचार मोफत दिला जात असून, त्याचा सरासरी खर्च ३० लाख रुपये इतका आहे.

संपर्कातील व्यक्तींना टीबी प्रतिबंधात्मक औषधोपचार दिले जातात. याशिवाय, नि-क्षय पोषण योजना अंतर्गत सरकारी व खाजगी नोंदणीकृत रुग्णांना दरमहा ₹१००० पोषण सहाय्य एक नोव्हेंबर २०२४ पासून दिले जात आहे.

# रेनी कार्निवल संवाद तरूणाईचा कार्यक्रमाचे आयोजन

**समता संघर्ष संघटन व समता संघर्ष संस्कृतिक मंच च्या वतीने विद्यार्थी, युवकांच्या कलागुणांना मिळणार वाव.**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : शिव,बिरसा, फुले, शाहू, आंबेडकरी चळवळ अधिक गतिमान करण्यासाठी आजचे युवक, युवती एकत्र येऊन काम करणे खूप गरजेचे आहे. तसेच त्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी व त्यांना विचारमंच उपलब्ध करून देण्यासाठी समता -संघर्ष संघटन यांच्या संयुक्त विद्यमाने शिव, बिरसा, फुले, शाहू, आंबेडकरी विचारधारेवर आधारीत विशेष युवकांसाठी रेनी कार्निवल संवाद तरूणाईचा या कार्यक्रमाचे आयोजन रविवार दि १४




सप्टेंबर २०२५ रोजी भिवंडी तालुक्यातील पडघा पाच्छापूर रोड जवळील दोंदे फार्म हाऊस येथे ठीक सकाळी ९.३० ते सायं. ५.३० वाजता करण्यात आले आहे. सदर कार्यक्रमाचे यंदाचे तिसरे वर्ष असून कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका कार्यकारी संपादक ,वृत्तपत्र लेखक उत्तम जोगदंड आहेत.तर प्रमुख पाहुणे म्हणून लेखिका, पटकथा लेखिका, महामानवाची गौरवगाथा आणि फुलराणी या टीव्ही मालिकांची संवाद लेखिका शिल्पा कांबळे उपस्थित रा-हणार असून तरुणांशी संवाद साधणार आहेत. यात ठाणे जिल्ह्यातील तरुण, तरूणी मोठ्या संख्येने सहभागी होऊन कविता, गाणी, समुहगिते, एकपात्री, समुह-संवाद गृप चर्चा, संसद-संवाद अशा विविध कला सादर करणार आहेत. शिव, बिरसा,फुले, शाहू, आंबेडकर चळवळ जिवंत ठेवणे ही काळाची गरज आहे. त्यासाठी तरुणांनी एकत्र येऊन काम केले पाहिजे. महामानवांच्या विचारांचा रथ पुढे नेऊन चळवळ जिवंत ठेवली पाहिजे. तसेच तरुण कार्यकर्त्यांच्या मनातील भावना मुक्त होण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

सदर कार्यक्रमात सर्वांनी सहभागी होण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# श्री गणेश विसर्जन मिरवणुकीतही उमटले कॉरिडरला स्थानिक नागरिकामधून मोठ्या प्रमाणात विरोध




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी :

गणपती विसर्जनाच्या मिरवणुकीमध्ये छत्रपती शिवाजी महाराज चौक दणाणून गेला होता. पंढरीतील प्रत्येक मंडळाने ढोल ताशा लेझीम तसेच विविध प्रकारच्या देखावाने सर्वांची लक्ष वेधून घेतले होते, परंतु दर्शन मंडप चौक गणेश उत्सव तरुण मंडळाने कॉरिडॉर विरोधी फलकातून भूमिका मांडत आपल्या भावना व्यक्त केल्या व विठ्ठल रुक्मिणी मंदिर परिसरातील प्रस्तावित कॉरिडॉर प्रकल्पामुळे बाधित झालेल्या कुटुंबाच्या भावना आता बाप्पाच्या विसर्जन मिरवणुकीतून व्यक्त झाले आहेत.

श्री गणेश विसर्जन मिरवणुकी दरम्यान दर्शन मंडप चौक गणेश उत्सव तरुण मंडळाने ऑर्डर विरोधी फलकातून मंदिर परिसर व जुन्या परंपरा जपण्याची मागणी करत, परंपरा व श्रद्धा जपताना बाधितांचे अस्तित्व नष्ट होऊ देऊ नये अशा शब्दात आपली भूमिका मांडली.

दर्शन मंडप चौक व रुक्मिणी पटांगण गणेश सेवा मित्र मंडळ, तांबेकर गल्ली गणेशोत्सव मंडळांनी भाजतांच्या भावना किती खोलवर आहेत हे अधोरेखित केले मंडळांनी नो कॉरिडोर चे बोर्ड हातात घेऊन श्रद्धा जपताना संसार मोडला जाऊ नये अशा स्वरूपाच्या भावना पाल फलकातून दिसून आल्या व कॉरिडॉर बाधितांवर होण-ारे परिणाम यांची विविध मुद्द्याच्या आधारे सविस्तर विश्लेषण सजावटीच्या माध्यमातून करण्यात आले.

बॉर्डर देखाव्यासाठी दर्शन मंडप चौक तरुण मंडळातील सर्व सभासद व कार्यकर्ते यांनी परिश्रम घेतले तर विशेष परिश्रम संतोष बारस्कर. अँड सोहम होरा, सतीश खंदारे, मुकुंद बडवे , श्रीराम साळुंखे, आदींनी विशेष परिश्रम घेतले.

# मानव अधिकार आंदोलन संघटनेच्या कळंब तालुका सचिव पदी दत्ता मोरे यांची निवड



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/प्रतिनिधी :

कळंब तालुक्यातील ईटकुर येथील दत्ता मोरे यांची मानव अधिकार आंदोलन संघटनेच्या कळंब तालुका सचिव पदी नुकतीच निवड करण्यात आली. या वेळी मानव अधिकार आंदोलन संघटनेचे संस्थापक अध्यक्ष हनुमंत भाऊ पाटुळे यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देऊन सत्कार करण्यात आला. सदर निवड कळंब येथे करण्यात आली. मानव अधिकार आंदोलन संघटना ही साहित्यरत्न लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ भाऊ साठे, लहुजी साळवे, छत्रपती शिवाजी महाराज, शाहू, फुले,आंबेडकर अशा थोर महापुरुषांच्या विचारावर चालत असून महाराष्ट्रातील वंचित व कष्टकरी, श्रमिक कामगार बांधवांचा उद्धार करण्यासाठी व कामगारांना वंचीतांना न्याय हक्क मिळवून देण्यासाठी आरोग्य, शिक्षण, प्रशासनाच्या अडी अडचणी सोडवण्यासाठी व शेवटच्या घटकांपर्यंत न्याय हक्क मिळवून देण्यासाठी चळवळ गतिमान करण्यासाठी सदर संघटनेमध्ये दत्ता शाहू मोरे यांची निवड करण्यात आली आहे. तरी सदरील पदाची जबाबदारी त्यांच्यावर आज रोजी देण्यात येत असून संघटने प्रति जबाबदारी पार पाडून कष्टकरी श्रमिक कामगारांना न्याय देऊन सहकार्य कराल अशी अपेक्षा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष हनुमंत भाऊ पाटुळे यांनी या वेळी आपले मत व्यक्त केले. यावेळी पोलीस पाटील संघटनेचे कळंब तालुका अध्यक्ष प्रदीप वायसे(पाटील),पत्रकार अशोक कुलकर्णी,पत्रकार प्रवीण कसबे, शिव-ाजी वाकळे, विशाल शिरसट, राहुल लोंढे, उप-स्थित होते. सदरील निवडीबद्दल मोरे यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.,

# दशरथ गड्डद यांचे निधन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : ग्रामपंचायत समर्थ नगर (ता. अक्कलकोट) येथील दशरथ रामचंद्र



गड्डद ( वय - ४० ) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, एक मोठा भाऊ, एक बहिणी, नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्यावर अक्कलकोट येथील लिंगायत स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.सोलापूर येथील चव्हाण शोरूममध्ये फोर व्हीलर विभागात वरिष्ठ मॅनेजर म्हणून कार्यरत अस-लेले हेमंत रामचंद्र गड्डद यांचे ते लहान बंधू होत.व दैनिक सुराज्यचे पत्रकार रविकांत धनशेट्टी यांचे ते सख्खा मेव्हणा होते.

# चारा छावण्यांच्या प्रलंबित बिलांबाबत मंत्री मकरंद आबा पाटील व आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांच्यामध्ये मुंबईत बैठक संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सांगोला/प्रतिनिधी : सांगोला व मंगळवेढा येथील थकीत चारा छावणीच्या बिलाबाबत आज मंत्रालय मुंबई येथे मदत व पुनर्वसन मंत्री मा.मकरंद आबा पाटील यांच्या अध्यक्षतेखालील व आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांच्या उप-स्थितीत बैठक पार पडली.यावेळी सदरच्या खात्याचे सचिव व इतर अधिकारी उपस्थित होते. आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांच्या या प्रलंबित प्रश्नांवर मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद आबा पाटील यांनी लवकरच चारा छावणी प्रलंबीत अनुदान प्रश्नावर सकारात्मक निर्णय घेण्यात येणार असल्याचे सांगितल्यामुळे चारा छावणी चालकांमधून आनंदाचे वातावरण तयार झाले आहे.

त्याचबरोबर महाराष्ट्र राज्याचे मुख्य सचिव राजेश कुमार यांची आज भेट घेऊन महाराष्ट्राचे मुख्य सचिव म्हणून आणि राज्य कार्यकारिणीचे समितीचे अध्यक्ष म्हणून ते काम पाहत असल्याने सांगोला आणि मंगळवेढा तालुक्यातील चारा छावणी धारकांचे अनुदान लवकरात लवकर उपलब्ध करून देण्यात यावे यासाठी विनंती केली

गेल्या अनेक वर्षांपासून सांगोला व मंगळवेढा येथील चारा छावणी बिले शासन दरबारी प्रलंबित असल्याने या छावणी चालकांची खूप



मोठी अर्थिक कुचुंबना होत आहे. छावणी चालकांच्या या मागणीवर आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी यापूर्वीही वेळोवेळी पाठपुरावा व निवेदनाच्या माध्यमातून तसेच विधानसभा सभागृहाच्या माध्यमातून अधिवेशनामध्ये चारा छावणी चालकांची रखडलेली बिले मिळण्यासाठी प्रयत्न केले आहेत.

**प्रलंबित बिलाबाबत लवकरच सकारात्मक निर्णय: मंत्री मकरंद आबा पाटील**

सांगोला व मंगळवेढा तालुक्यातील छावणी चालकांनी चारा छावणीच्या माध्यमातुन अनेक जनावरे जगवली आहेत.तत्कालीन दुष्काळजन्य परिस्थितीमध्ये तालुक्यातील पशुधन व पशुपालक यांचे हित डोळ्यासमोर ठेवून या छावणी चालकांनी खूप मोठी आर्थिक गुंतवणूक केली होती. या चारा छावणी चालवण्यासाठी छावणी चालकांनी कर्ज काढून छावण्या चालवल्या आहेत.

२०२४ च्या मंत्री मंडळाच्या बैठकीत मदत व पुनर्वसन मंत्री मा.मकरंद आबा पाटील यांनी तो थकीत बिले देण्याबाबतचा निर्णय सर्वानुमते घेण्यात आला.काही चारा छावणी चालकानी सुधारीत प्रस्ताव दिलेला असुन सध्या सांगोला तालुक्यातील २० कोटी ८६ लाख ९० हजार ५९६ रुपये व मंगळवेढा तालुक्यातील १२ कोटी ७ लाख ५० हजार ७३१ रुपये एवढी बिले थकीत आहेत ती बिले ताबडतोब मिळावीत अशी मागणी लावून धरली होती.




आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांच्या या मागणीला लवकरच यश प्राप्त होणार असून प्रलंबित बिले येत्या काळात छावणी चालकांना मिळणार आहेत.

कोट :- मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद आबा पाटील यांनी सांगितले की, सदर प्रकरणाची फाईल मा.मुख्यमंत्री महोदय यांचेकडे जाऊन संबंधित खात्याकडे आलेली असुन लवकरच या प्रश्नावर सकारात्मक निर्णय घेतला जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

**केंद्रीय ऊर्जा मंत्र्यांना जिल्हाधिकाऱ्यांमार्फत निवेदन सादर**

**विज कर्मचारी, महाराष्ट्र विज कामगार महासंघाकडून निवेदन**

# खाजगीकरण आणि वाढत्या कंत्राटीकरणाला महाराष्ट्र वीज कामगार महासंघाचा विरोध

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**


धाराशिव/प्रतिनिधी

विद्युत कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करा, एक राष्ट्र एक ग्रीड एक सेवा नियम लागू करा, विद्युत कायदा २००३ कलम १३३ च्या शिफारशींच्या अंमलबजावणीसाठी त्रिपक्षीय औद्योगिक समिती स्थापन करा, विद्युत निर्मिती पारेषण आणि वितरण मधील खाजगीकरणाला आळा झाला, गुत्तेदारी फ्रेंचायसीकरण रद्द करून बाह्य स्त्रोत कर्मचारी यांना सामाजिक सुरक्षा तसेच समान काम समान वेतन लागू करा,

विद्युत कायदा २००३ आणि विद्युत संशोधन बिल २०२३ यावर पुनर्विचार करा, महाराष्ट्रामधील वीज कर्मचारी अभियंते अधिकाऱ्यांना पेन्शन योजना लागू करा, ३२९ उपकेंद्र कंत्राटदाराला देण्याचा निर्णय रद्द करा, महाराष्ट्रातील तिन्ही वीज कंपन्यांमध्ये रिक्त पदांवरील भरतीसाठी निश्चित कार्यक्रम ठरवा, वितरण पारेषण आणि महानिर्मिती कंपनीमधील ट्रान्सफर पॉलिसी राबवताना कामगार संघटनांना विश्वासात घ्या, ४३ हजार कंत्राटी कामगारांना सुयोग्य वेतन आणि कायम कर्मचाऱ्यांचा दर्जा देण्याचा निर्णय घेण्यात यावा,वेतन एनामली कमिटीकडे प्रलंबित असलेल्या सर्वच विषयांवर त्वरित निर्णय व्हावा, वीज कर्मचाऱ्यांची सुरक्षितता आणि संरक्षण होण्यासाठी विशेष उपाययोजना कराव्यात या आणि इतर मागणीसाठी महाराष्ट्रातील सर्वच जिल्हाधिकारी महोदय मार्फत मंगळवारी (दि. ९ रोजी ) केंद्रीय ऊर्जा मंत्र्यांना वीज क्षेत्रातील कामगारांच्या मागण्या संदर्भात निवेदन देण्याच्या सूचना कामगार महासंघाच्या राज्य कार्यकारिणीने दिल्या होत्या.

यावेळी धाराशिव जिल्ह्यातील विज कर्मचारी, महाराष्ट्र विज कामगार महासंघा कडून निवेदन देण्यात आले. धाराशिव निवासी उप जिल्हाधिकारी शोभा जाधव यांच्या मार्फत केंद्रीय ऊर्जामंत्री श्री मनोहरलाल कट्टर यांना हे निवेदन सादर करण्यात आले.

यावेळी महावितरण कंपनीचे महाराष्ट्र विज कामगार महासंघाचे लातूर परिमंडळ अध्यक्ष नवनाथ बडे, सचिव प्रवीण रत्नपारखी, धाराशिव अध्यक्ष शाम आबाचणे, सहसचिव विनोद कुंभार, तुळजापूर विभागीय अध्यक्ष अमोल पाटील, सचिव मोहन गुरव, धाराशिव उमाकांत जाधव, सुरज गायकवाड आदी पदाधिकारी उपस्थित होते.



# घरकुल, अहिल्यादेवी सिंचन विहिरीचा लाभ सर्व सामान्य लोकांना झाला पाहिजे याचे नियोजन करा

## पंढरपूर येथे आमदार समाधान आवताडे यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
पंढरपूर/प्रतिनिधी :
पंढरपूर तालुक्यातील नागरिकांच्या घरकुल जलजीवन आणि अहिल्यादेवी सिंचन विहीर या संदर्भातील अडीअडचणी सोडवण्यासाठी बुधवारी पंढरपूर पंचायत समिती येथील शेतकी भवन येथे आमदार समाधान आवताडे यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक पार पडली.

आढावा बैठकीच्या सुरुवातीला आमदार समाधान आवताडे यांनी घरकुल, अहिल्यादेवी सिंचन विहिरी आणि जल जीवन योजनेचा आढावा संबंधित अधिकाऱ्यांकडून घेऊन नागरिकांकडून समस्या जाणून घेतल्या. यावेळी उपविभागीय अधिकारी सचिन इथापे, तहसीलदार सचिन लंगुटे, गटशिक्षणाधिकारी सुशील संसारे उपस्थित होते. या बैठकीसाठी मोठ्या संख्येने पंढरपूर तालुक्यातील नागरिक उपस्थित होते.

**आमदार समाधान आवताडे यांच्या प्रशासकीय अधिकाऱ्यांना सूचना**

सदर आढावा बैठकीदरम्यान पंढरपूर मतदार संघातील नागरिकांनी आमदार आवताडे यांच्यासमोर समस्यांचा पाढा वाचला. नागरिकांच्या अडी-अडचणी जाणून घेऊन आमदार आवताडे यांनी संबंधित अधिकारी आणि तक्रारदार नागरिक गावातील सरपंच यांना समोरासमोर बोलावून लवकरात लवकर तोडगा काढून प्रश्न सोडवण्याच्या सूचना संबंधित प्रशासकीय अधिकाऱ्यांना दिल्या.

याप्रसंगी बोलताना आमदार समाधान आवताडे यांनी भारतीय जनता पार्टीच्या सरकारने राज्यातील नागरिकांसाठी शासनाच्या घरकुल आणि अहिल्यादेवी सिंचन विहीर या योजना राबवल्या जात आहेत. या सर्व योजना नागरिकांपर्यंत विनाअडथळा पोहोचवाव्यात मतदार संघातील काही गावामध्ये विहिरीच्या लाभार्थी अत्यंत कमी प्रमाणात असल्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांना लाभार्थी वाढविण्यासाठी सूचना दिल्या यासाठी आढावा बैठकीच्या माध्यमातून नागरिकांच्या समस्यांवर तोडगा काढून प्रश्न सुटावेत यासाठी या आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले असल्याचे सांगितले.



पुढे बोलताना ते म्हणाले की शेततळ्यासाठी जादा अनुदान मिळावे यासाठी सभागृहात कृषिमंत्र्याकडे पाठपुरावा करायला असल्याचे सांगितले.

तसेच मागणी करणाऱ्या शेतकऱ्यांना विहीर मंजूर करण्यात यावी. याचबरोबर जल जीवन मिशन अंतर्गत होणारी कामे दर्जेदार पद्धतीचे करून घ्यावीत. जलजीवन कामाच्या योजनेत उदासीनता असल्याने खंत व्यक्त करत यांनी कामे पूर्ण झाल्याशिवाय बिल देऊ नयेत. झालेल्या कामाचा दर्जा तपासावा अशा सूचना केल्या. मतदार संघातील ज्या लोकांच्या जल जीवन योजनेबाबत तक्रारी आहेत अशा नागरिकांनी माझ्याकडे लेखी स्वरूपात अर्ज द्यावेत त्यावरती मी लवकरच कार्यकारी अभियंता सह संबंधित सर्व अधिकारी व ठेकेदार यांच्या समवेत बैठक घेणार असल्याचे सांगितले.

यावेळी त्यांनी घरकुल योजनेतील लाभार्थ्यांचे एकही घरकुल रद्द करू नये. जागेची समस्या असल्यास त्यावर योग्य तोडगा काढून गायरान, गावठाण यामध्ये जागा घरकुलासाठी उपलब्ध करून द्यावी. जागेसाठी शासनाकडून देण्यात येणारी आर्थिक मदत घेऊन घरकुल पूर्ण करावे. घरकुल बांधकामासाठी शासनाच्या वतीने देण्यात येणारी मोफत वाळू माती मिश्रित न देता चांगल्या पद्धतीची द्यावी. घरकुल योजनेचा लाभ जास्तीत जास्त नागरिकांना देण्यात यावा. यावेळी घरकुल योजनेतील लाभार्थ्यांच्या जागेच्या अडचणी बाबत प्रांताधिकारी तहसीलदार गटविकास अधिकारी यांनी संयुक्तपणे बसून अडचणी दूर करून यातील एकही घरकुल माघारी जाणार नाही याची दक्षता घ्यावी. अशी अपेक्षा व्यक्त करत शासनाच्या घरकुल, जलजीवन, अहिल्यादेवी सिंचन विहीर योजना नागरीकांपर्यंत विनाअडथळा पोहोचवण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

यावेळी त्यांनी नागरिकांना शासनाच्या विविध योजनेतून होणारी कामे दर्जेदार पद्धतीने करून घेण्याचे आवाहन केले. यावेळी नागरिकांनी समस्या जाणून घेतल्याबद्दल आमदार आवताडे यांचे आभार मानले..

# बोरफळ येथील महिमा; जगताप यांनी गर्भअवस्थेत केले ज्ञानेश्वरी लिखाण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
औसा प्रतिनिधी/अमर जाधव :
शुद्ध बीजापोटी- फळे रसाळ गोमटी ! या उक्तीप्रमाने आपल्या जन्मनार्या बाळावर चांगले धार्मिक व सांप्रदायीक संस्कार व्हावे यासाठी गर्भ अवस्थेत असताना स्वत हाताने ज्ञानेश्वरी लिखाण करुन ज्ञानेश्वरी ग्रंथ तयार केला आहे ,बोरफळ येथील विष्णू नारायण जगताप यांचे आजोबा:- बब्रूवान बळीराम जगताप . यांनी घरा मध्ये सांप्रदायाची आवड निर्मान करुन दीली . त्यांना शिवलीला अमृत या ग्रंथाची खूप आवड होती.ते भगवान शंकराचे मोठे उपासक होते. महिन्याचा प्रदोष उपवास करून शिवलीलामृत ग्रंथाचे पूर्ण पारायण आजोबा करायचे. वारकऱ्याबद्दल आदर आणि अन्नदान छंद त्यांना मोठ्या प्रमाणात होता . त्यांना काकडा गायची खूप आवड होती. रोजच्या वाचनामध्ये भजन व वेगवेगळे पुराण व ग्रंथाचे वाचन करायचे वयाच्या १०१ व्या वर्षी बब्रुवान बळीराम जगताप यांनी आपला देह ठेवला. व ह भ प विष्णू महाराज जगताप हे लहान पणापासून महाराज आजोबा बरोबर काकड आरती साठी जात असत. विष्णू महाराज जगताप यांना आजोबा मुळेच परमार्थाची आवड लागली. तसेच त्यांचे वडील नारायण बब्रूवान जगताप हे गावातील हरिपाठ, भजन,किर्तन इत्यादी कार्यक्रमात उपस्थित राहतात. व वडील चोपदार म्हणुन आपली सेवा देतात.आज तागायत ते महिना वारी पंढरीची वारी करतात. त्याच कारणामुळे घरामध्ये परमार्थिक वारसा लाभला. विष्णु महाराज जगताप हे औसा येथे भक्ती माधुर्य संगीत क्लासेस औसा या नावाने संगीत क्लासेस चालवतात. त्यांच्यामार्फत बरेच लहान मुले सांप्रदायाचा वारसा चालवत आहे. आणि सुसंस्कृत पिढी तयार करत आहेत. ह भ प विष्णु महाराज जगताप यांची पत्नी महिमा विष्णु जगताप यांनी आपल्याही मुलावर काहीतरी संस्कार व्हावेत म्हणून त्यांनी हिंदू संस्कृतीमध्ये १६ संस्कार सांगितले आहे त्यामधील गर्भधान संस्कार सांगितला आहे त्या संस्कारांमध्ये आपण केलेले कार्यातून गर्भातील मुलावर चांगले संस्कार घडत असतात म्हणून त्यांनी तीन महिन्यांमध्ये ज्ञानेश्वरी या ग्रंथातील १८ अध्याय लिहून ज्ञानेश्वरी ग्रंथ पूर्ण केला. आणि महिमा विष्णू जगताप यांना ०९ सप्टेंबर रोजी मुलगा पुत्ररत्न प्राप्त झाले ,



विष्णु महाराज यांचे सासरे दगडु भालेकर हे ही सांप्रदायीक असल्याने महिमा यांना सांप्रदायाची आवड आहे ,यावेळी प्रत्येक आईने आपल्या पोटात बाळ गर्भधारनेवेळी ग्रंथ वाचन करावे व आपल्या होणार्या बाळावर चांगले संस्कार घडावे यासाठी ग्रंथ वाचन करावे असे महिमा जगताप यांनी सांगीतले यावेळी

ह भ प गहिनीनाथ महाराज गोमदे, ह भ प.मुक्ताई बळीराम दळवे, सतिष माळी, वैजनाथ सुर्यवंशी , कुमार महाराज लोमटे, विठ्ठल रुक्मिणी भजनी मंडळ बोरफळ , भक्ती माधुर्य संगीत क्लासेस सर्व विद्यार्थी यांनी हार्दिक शुभेच्छा दिल्या...

# सांगोला विधानसभा मतदारसंघातील ग्रामीण भागातील सिंगल फेज लोडशेडिंग तात्काळ बंद करा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
सांगोला/प्रतिनिधी :
सांगोला विधानसभा मतदारसंघातील ग्रामीण भागातील सिंगल फेज लोडशेडिंग तात्काळ बंद करण्याबाबत आज मुंबई येथे मुख्यमंत्री मा.ना.देवेंद्र फडणवीस यांची आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी भेट घेत सिंगल फेज लोडशेडिंग तात्काळ बंद करण्यात यावे अशी निवेदनाद्वारे मागणी केली.

सांगोला विधानसभा मतदारसंघातील गावांमध्ये मागील काही महिन्यांपासून सिंगल फेज लोडशेडिंग हा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. ग्रामीण भागातील सर्वसामान्य जनता, शेतकरी, विद्यार्थी, लघुउद्योग यांना या लोडशेडिंग धोरणामुळे प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. सिंचनासाठी पिकांना वेळेवर पाणी देता येत नसल्याने शेतकऱ्यांचे उत्पादन धोक्यात आले

**आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मागणी**

आहे. विद्यार्थ्यांचे अभ्यासाचे नुकसान होत असून, लघुउद्योग आणि व्यवसाय ठप्प होत आहेत. सर्वसामान्य कुटुंबांच्या दैनंदिन जीवनावर प्रतिकूल परिणाम होत



आहे. राज्य शासन 'स्मार्ट महाराष्ट्र' आणि 'शेतकरी सशक्तीकरणा'चे उद्दिष्ट ठेवून कार्यरत आहे, परंतु प्रत्यक्षात ग्रामीण भागात वीजपुरवठ्याच्या अन्यायकारक लोडशेडिंगमुळे नाराजी आणि असंतोष प्रचंड प्रमाणात वाढत असल्याचे मुख्यमंत्री महोदयांना सांगितले. याबाबत आपण तातडीने हस्तक्षेप करून ग्रामीण भागातील सिंगल फेज लोडशेडिंग बंद करण्याचे आदेश द्यावेत आणि अखंडित वीजपुरवठा सुरु करावा अशी मागणी मुख्यमंत्री महोदयांकडे केली.

यावेळी मुख्यमंत्री मा.ना.देवेंद्र फडणवीस यांनी याबाबत लवकरात लवकर सकारात्मक निर्णय घेण्याचे मान्य केले. याबद्दल आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी मुख्यमंत्री महोदयांचे आभार मानले.

# जिल्हास्तरीय फुटबॉल स्पर्धेत एमआयटी ज्यु. कॉलेज संघाची दमदार कामगिरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
सोलापूर/प्रतिनिधी : सोलापूर जिल्हा क्रीडा विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय फुटबॉल स्पर्धेत वाखरी, पंढरपूर येथील एमआयटी ज्युनिअर कॉलेज संघाने ऐतिहासिक कामगिरी करत प्रथम क्रमांक पटकावला. सोलापूरमधील प्रसिद्ध वालचंद कॉलेजच्या मैदानावर जरार कुरेशी यांच्या उपस्थितीत झालेल्या या स्पर्धेत एमआयटीच्या खेळाडूंनी प्रतिस्पर्धकांना कडवी झुंज देत विजेतेपदावर नाव कोरले.



१९ वर्षांखालील गटातील या स्पर्धेत जिल्ह्यातील अनेक नामांकित शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयांनी सहभाग घेतला होता. प्रत्येक सामना अत्यंत चुरशीचा होता.

एमआयटी ज्यूनिअर कॉलेजच्या संघाने आपल्या उत्कृष्ट संघभावनेच्या जोरावर प्रत्येक अडथळ्यावर मात केली. अंतिम सामन्यात कुशल खेळ आणि अचूक रणनीतीच्या जोरावर विजेतेपदावर आपले नाव कोरले.

या कामगिरीमुळे पुणे विभागीय स्पर्धेसाठी त्यांची निवड झाली आहे, जी संपूर्ण संस्थेसाठी एक अभिमानास्पद बाब आहे. यासाठी क्रीडा शिक्षक प्रवीण पिसाळ यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून त्यांचा आत्मविश्वास द्विगुणित केला. या यशानंतर कॉलेजचे प्राचार्य डॉ. स्वप्नील शेठ आणि हेड मिस्ट्रेस शिबानी बॅनर्जी यांनी विजयी खेळाडूंना व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले आणि आगामी विभागीय स्तरावरील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. जिल्हास्तरीय फुटबॉल स्पर्धेतील एमआयटी ज्यूनिअर कॉलेजचा विजयी संघ कॅप्टन सोहम बहुरूपी, प्रथमेश भिंगे, धिरज कदम, अथर्व जगताप, कृष्ण शास्त्री, राजवीर कुलकर्णी, पारस शेठ, प्रणव शहा, संस्कार मुळे, अर्जन लवटे, उदय खरात, ओंकार लगड, मयुरेश थोरात, श्लोक शर्मा, समीक्ष डोलतडे, अथर्व पाटील, ओमकार तिडके आणि ओंकार देसाई.

**स्वेरीत राष्ट्रीय स्तरावरील तांत्रिक स्पर्धा 'ऑलम्पस २ के २५' १५ व १६ सप्टेंबरला होणार**

# स्वेरीत 'ऑलम्पस २ के २५' तांत्रिक स्पर्धेच्या पोस्टरचे उद्घाटन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
पंढरपूर/प्रतिनिधी : स्वेरीमध्ये सातत्याने राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांमुळे अभियांत्रिकी विद्यार्थ्यांना आपली सुप्त प्रतिभा आणि कौशल्ये प्रदर्शित करण्यासाठी प्रभावी व्यासपीठ उपलब्ध होत असते. या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या बौद्धिक क्षमतेला चालना मिळून तांत्रिक बाबींच्या सखोल अभ्यासाची वृत्ती अधिक दृढ होत आहे. या उपक्रमांच्या यशस्वी परंपरेचा एक भाग म्हणून विद्यार्थ्यांच्या विशेष आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरणारी 'ऑलम्पस २ के २५' ही राष्ट्रीय स्तरावरील तांत्रिक स्पर्धा येत्या १५ व १६ सप्टेंबर रोजी स्वेरी मध्ये आयोजित करण्यात आली आहे. शिक्षक दिनाचे औचित्य साधून नुकतेच या तंत्रस्पर्धेच्या पोस्टरचे उद्घाटन प्रमुख पाहुणे व महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ (एमएसबीटीई) मुंबईचे माजी संचालक डॉ. प्रकाश खोडके यांच्या हस्ते व मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले.

गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील श्री विठ्ठल एज्युकेशन ॲण्ड रिसर्च इन्स्टिटयूट संचालित अभियांत्रिकी महाविद्यालयात दि. १५ व दि. १६ सप्टेंबर रोजी आयोजिलेल्या 'ऑलम्पस २ के २५' या राष्ट्रीय स्तरावरील तांत्रिक स्पर्धेत इग्नाईटमेक, स्पेल बी, थिंक-बझ टॉक, आर्डुइनो चॅलेंज, ब्रिज मेकिंग, सॉईल आर्ट, मिरर कोड, जस्ट अ मिनिट टायपिंग, ई-क्विझ, इलेक्ट्रिकल मास्टर, बिझविझ, टेक क्विझिझ, कॉम्पोनंट्स क्लॅश, कॅड क्लॅश, टेक शार्क्स, कॅम्पस ड्राईव्ह, मिनी-हॅकाथॉन,





एस्केप रूम, कॅड रेस, सिव्हिल-टेक्नो क्विझ, इलेक्ट्रो एक्स्टेम्पोर, पोस्टर प्रेझेंटेशन, डिस्कसाथॉन असे जवळपास २३ तांत्रिक इव्हेंटस् असून यासाठी विजेत्यांना जवळपास एक लाखांपर्यंतची रोख रक्कम, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्रे ही बक्षिसे ठेवण्यात आली आहेत.

या तांत्रिक स्पर्धेत अभियांत्रिकी तसेच पदविका अभियांत्रिकीचे विद्यार्थी सहभाग घेऊ शकतात. यासाठी संस्थेचे संस्थापक व अभियांत्रिकीचे प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे, संस्थेचे सचिव डॉ. सुरज रोंगे व उपप्राचार्या डॉ. मीनाक्षी पवार यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी अधिष्ठाता डॉ.महेश मठपती, संशोधन अधिष्ठाता डॉ.अमरजित केने, समन्वयक प्रा. डी.टी. काशीद यांच्या नेतृत्वाखाली विद्यार्थ्यांच्या वतीने ऑलम्पस २ के २५ चे विद्यार्थी अध्यक्ष अवधूत भोसले, उपाध्यक्ष गणेश सुरवसे, सचिव गिरीजादेवी देशमुख, संयुक्त सचिव पीयूष चोपडे व जय गाडेकर, खजिनदार उदयराज आवाड आणि सहखजिनदार सुहानी शिंदे यांच्यासह सर्व विभागप्रमुख, प्राध्यापकवर्ग व विद्यार्थी परिश्रम घेत आहेत. 'ऑलम्पस २ के २५' च्या निमित्ताने अभियांत्रिकीच्या सर्व विभागात जय्यत तयारी केली जात असल्याचे चित्र दिसत आहे.

'ऑलम्पस २ के २५' या स्पर्धात्मक कार्यक्रमाच्या अधिक माहितीसाठी ऑलम्पस चे समन्वयक प्रा.डी.टी. काशीद (मोबा. ८२०८७२४२६६), डॉ. डी. डी. रोंगे (मोबा.९८९०६९५९५७), प्रा. के. आय. चौहान (मोबा. ९५८८६४१५९०), प्रा. एस. एस. गावडे (मोबा. ९४२०७ ६३८५०, प्रा. पी. एच. गुंड (मोबा.८७९३०४३०८३), प्रा. एस. बी.खडके (मोबा. ८३८००५०६२२), प्रा. के. पी. कोंडुभैरी (मोबा. ८६३७७९६६९३), प्रा. ओ. व्ही. मंगले (मोबा. ८२०८८९१००१) यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन देखील यावेळी केले आहे.

यावेळी संस्थेचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग चे प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे, संस्थेचे सचिव डॉ. सुरज रोंगे, संस्थेचे माजी अध्यक्ष व विश्वस्त दादासाहेब रोंगे, संस्थेचे विश्वस्त एच. एम. बागल, स्वेरीचे कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम. एम. पवार, संस्थेअंतर्गत असलेल्या डिप्लोमा इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. एन.डी. मिसाळ, बी. फार्मसीचे प्राचार्य डॉ.एम.जी. मणियार, डी. फार्मसीचे प्राचार्य प्रा.एस. व्ही. मांडवे, अभियांत्रिकीच्या उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, सर्व अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी प्रतिनिधी गिरीजादेवी देशमुख, सुहानी शिंदे, नेहा जिरपे, पीयूष चोपडे, गणेश सुरवसे, विद्यार्थी व पालक यांच्या उपस्थितीत करण्यात आले.